सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी या संवर्गाची अंतिम सेवा ज्येष्ठता सूचीबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः याचिका-०६१४/प्र.क्र.१९६/परि-४,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २४ ऑक्टोंबर, २०१७

वाचा :

१) शासन परिपत्रक, गृह विभाग क्रमांकः याचिका-०६१४/प्र.क्र.१९६/परि-४, दिनांक २३.१०.२०१७.

शासन परिपत्रक:-

सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांची दिनांक ०१.०१.१९९५ ते ३१.१२.२०१० या कालावधीत कार्यरत असलेल्या अधिका-यांची दिनांक ०१.०१.२०११ रोजीची व तद्नंतरची दिनांक ०१.०१.२०१२, दि. ०१.०१.२०१३, दि. ०१.०१.२०१४, दि. ०१.०१.२०१५, दि. ०१.०१.२०१६ व दि. ०१.०१.२०१७ रोजीची अंतिम ज्येष्ठता सूची दि. २३.१०.२०१७ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे. परंतू, सदर परिपत्रकासोबत जोडण्यात आलेल्या सेवाज्येष्ठता परिशिष्ठांची छाननी केली असता दि. ०१.०१.२०१५, दि. ०१.०१.२०१६ व दि. ०१.०१.२०१७ रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची परिशिष्ठामध्ये टंकलेखन त्रुटी आढळून आल्या आहेत.

२. सबब, उपरोक्त परिपत्रकातील दि. ०१.०१.२०१५, दि. ०१.०१.२०१६ व दि. ०१.०१.२०१७ रोजीची अंतिम ज्येष्ठतासूचीबाबतची परिशिष्ठे रद्द करण्यात येत आहेत. सदर सेवाज्येष्ठता सूचीमधील त्रुटींची सविस्तर छाननी करुन याबाबत नव्याने दि. ०१.०१.२०१५, दि. ०१.०१.२०१६ व दि. ०१.०१.२०१७ रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात येईल.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१०३११५४५१९७४२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Madhukar Sarjerao Ghogare

Digitally signed by Madhukar Sarjerao Ghogare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=539635e59a0a994a979279d79261fa9f3f907 0d1a37dfe29dbc4be5d1c827801, serialNumber=344b951816c517fcea0454e21d7fde25 cc87830c180514dafd445ec2bc6b50bf, cn=Madhukar Sarjerao Ghogare
Date: 2017.10.31 16:46:06 +05'30'

(म. स. घोगरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी.

३. सर्व संबंधित अधिकारी (परिवहन आयुक्त कार्यालय यांच्यामार्फत).

४. निवड नस्ती (परिवहन-४).